# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),**
**ता.जि. ठाणे, 401 101.**


**जा.क्र.मनपा/आस्था/ 17 /2025-26** **दि. 02 / 04 /2026**

**परिपत्रक**

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात आपले सरकार, पी.जी.पोर्टल, मुख्यमंत्री (CMO), My MBMC, नागरिक दिन, मा.आमदार/खासदार, मा.नगरसेवक, लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून विविध प्रकारच्या तक्रारी प्राप्त होत असतात सदर प्राप्त तक्रारीवर विहित मुदतीत कार्यवाही करुन संबंधीतांना कळविणे आवश्यक आहे.

परंतू प्राप्त होणाऱ्या तक्रारी अर्जावर विलंबाने कार्यवाही होत असल्यामुळे तसेच तक्रारदार यांना समाधानकारक उत्तर दिले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, आपले सरकार, पी.जी.पोर्टल, मुख्यमंत्री (CMO), My MBMC, नागरिक दिन, मा.आमदार/खासदार, मा.नगरसेवक, लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारीचे दखल घेऊन संबंधित विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी सदर तक्रारीचे विहित मुदतीत निराकरण करण्यात यावे व याबाबत तयार करण्यात आलेली Google Sheet अद्यावत करण्यात यावी.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख
/- सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून आपल्या विभागात प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करणेकरीता सूचित करण्यात यावे.

प्रत माहितीस्तव -
मा.आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका